**एम.बी.मोरे महीला महाविदयालयात 'जागतिक महीला दिना'निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन**

शनिवार दि.०७.०३.२०२० रोजी एम.बी.मोरे फाउंडेशन संचलित कला वाणिज्य आणि विज्ञान महीला महाविदयालयाच्या महीला विकास कक्षातर्फे **जागतिक महीला दिनानिमित्त** विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. दरवर्षीप्रमाणे एम.बी.मोरे महीला महाविदयालयात महीला दिन सप्ताह मोठया उत्साहात साजरा केला जातो.या सप्ताहात महाविदयालयातील विदयार्थ्यीनींसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान स्पर्धा इ.आयोजन केले जात.

यंदा **महीला विकास कक्षा**च्या प्रमुख प्रा.सौ.दिपाली वारंगे यांच्या नियोजनानुसार महाविदयालयातून तळाघर महादेववाडी पर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले.महीला महाविदयालय तसेच कनिष्ठ महाविदयालयाच्या १३२ विदयार्थ्यीनींनी यात सहभाग घेतला. या रॅलीदरम्यान विदयार्थ्यीनींनी महीलांच्या सक्षमीकरणाबाबतचे फलक धरून घोषणादेखील दिल्या. या रॅलीदरम्यान तळाघर येथील प्रभाकर पाटील एज्यु.सोसायटीच्या हायस्कूलच्या परिसरात महीला महाविदयालयाच्या विदयार्थ्यीनींनी महीलांवरील अत्याचार या विषयावर पथनाटय सादर केले.तसेच द्वितीय वर्ष कला वगातील कु.श्रुती खराडे हीने **निर्भया हत्याकांडावर** आधारित एकपात्री नाटक याप्रसंगी सादर केले.

कार्यक्रमाप्रसंगी पी.एन.पी.हायस्कूलचे श्री.नंदकुमार पाटील श्री.ललित पाटील मुंढे मॅडम तसेच एम.बी.मोरे महीला महाविदयालयाचे प्राचार्य श्री.प्रसन्न म्हसळकर प्रा.हणमंत ढवळे प्रा.दिपेश भगत प्रा.मितेश मोहीते प्रा.माधुरी जाधव प्रा.प्रतिमा भोईर प्रा.निकिता महाडीक प्रा.हेमलता पाटील प्रा.पुनम भिसे आणि ग्रंथपाल सौ.निलिमा थोरात आदी उपस्थित होते.